# महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

प्रकाशगड, २रा मजला, प्लॉट नं. जी-९, प्रो. अनंत काणेकर मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०००५१.
दूरध्वनी क्र. : ०२२-२६४७४२११ विस्तारित : ३६४२, फक्स : ०२२-२६५८१५१६.
ई-मेल : promahagenco@gmail.com / promahagenco1@gmail.com


क्र. : सा.नि.सु./जनसंपर्क/वृत्तपत्रीय टिप्पणी/ दिनांक : ०९/०६/२०२०.

## नाशिक औष्णिक वीज निर्मिती केंद्रामधील कर्मचारी यांनी केली आदिवासी पाड्यात मदत

--------------------

**नाशिक (दि. ०९ जून २०२०) :** महानिर्मितीच्या नाशिक औष्णिक वीज निर्मिती केंद्रामधील बॉयलर मेंटेनन्स विभागातीळ कर्मचारी यांनी दुर्गम डोंगराळ भागातील आदिवासी वस्तीमध्ये दैनंदिन किराणा, लहान मुलांना बिस्किट्स आणि कपडे वाटप करत आपलाही मदतीचा हात दिला .

स्वतःच्या मालकीची हक्काची जमीनही नसलेल्या आणि केवळ दैनंदिन मजुरीवर अवलंबून असलेल्या या आदिवासी पाड्यातील ग्रामस्थानची लोकडाऊनमुळे अत्यंत बिकट अवस्था झाली आहे त्यातच कोरोनाची निर्माण झालेली भीती यामुळे अत्यंत अस्वस्थ असलेल्या या बांधवाना सरकारी मदतीबरोबरच आपणही पुढाकार घेत मदत करून धीर दिला पाहिजे या भावनेतून औष्णिक वीज निर्मिती केंद्रामधील बॉयलर मेंटेनन्स विभागाने विभाग प्रमुख मा. अतुल सोनजे यांच्या पुढाकाराने चाफ्याचा पाडा, धाब्याचा पाडा, मांगोने या ठिकाणी सामाजिक कार्यकर्ते नंदू गवळी यांच्या साहाय्य्यने भेट देत साहित्य सुपूर्द केले. त्याचवेळी ग्रामस्थांना कोरोना संसर्ग होऊ नये म्हणून घ्यायची काळजी याबाबत मार्गदर्शन केले व त्यांना धीर दिला.

या उपक्रमासाठी नाशिक औष्णिक वीज निर्मिती केंद्राचे मुख्य अभियंता श्री आव्हाड यांनी प्रोत्साहन देत मार्गदर्शन केले. महानिर्मितीच्या या कर्मचाऱ्यानी आपली सेवा बजावत असताना सामाजिक बांधिलकी जपत एक आदर्श निर्माण केला आहे.

---

दिनांक : ०९/०६/२०२०.

प्रति,

**मा. संपादक**
**दैनिक / वृत्तवाहिनी**

आदरणीय महोदय / महोदया,

कृपया सदर बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकाच्या सर्व आवृत्तींत / वाहिनीवर प्रसिद्ध करावी, ही नम्र विनंती.

धन्यवादासह,

आपले स्नेहांकित,

**(महेश आफळे)**
**जनसंपर्क अधिकारी**